# राशिभविष्य - जानेवारी २०२३.

**दादा दामले (dadadamle@gmail.com}**

==============================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या अन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या राशीच्या जन्मनक्षत्रासाठी असलेल्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही आपल्या राशीच्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून उपयोग करून पाहावा, व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे सतत अपमानास्पद घटना घडण्याची शक्यता दिसते. शिवाय त्याच्यामुळे वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यताही दिसते. राहूसह असलेला वक्री हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल होणार असला तरी त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे कोणाचा धाक, दडपण असह्य होईल. या राशीची लहान मुले तर अतिशय खोडकर, हूड, खट्याळ होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची समस्या त्रस्त करील. तसेच देणे द्यावेच लागेल; पण येणे येण्याची खात्री देता येत नाही. त्याशिवाय उष्णता विकार बळावल्यास डोळे, मान, घसा, दाढा यांपैकी कशाचा तरी आजार त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, अस्वस्थ राहील. त्याशिवाय वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत रवि व बुध असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे मन निराश होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला बुध मात्र संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल

असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत प्रथमपासून वक्री शनि व शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पण येथील शुक्र व शनि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत जात आहेत. शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अडचणी, दुःख सहन करावे लागेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गेल्यावर सर्व प्रकारे सुखकारकच होईल. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत असलेला शनि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गेल्यावर म्हणजे महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होईल. पण संततीपैकी कोणास कसला तरी त्रास होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. पण तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कुमार्गी मित्रांचा सहवास बाधक होईल. जपा. शिवाय त्याच्यामुळे अर्थप्राप्तीतही घोटाळे, विलंब,होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी मीन या स्वराशीत गुरु असून अध्यात्माची आणि सामाजिक कार्याची आवड असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास व अपेक्षाभंग होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ ओम यमाय नमः:”तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. अशा परीस्थितीत या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी होईल, मानापमानाच्या कल्पना प्रबळ होतील, अकारण श्रम, दगदग कराल तर शरीरपीडा होईल. हा मंगळ नोकरदार मंडळींना प्रतिकुल व मनस्तापदायक होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, आचारविचार उच्च होतील, सर्व ठिकाणी सहकार्य लाभेल,मन उदार होईल, क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत रवि आणि बुध असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल.

इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, हाती घेतलेल्या कामात अपयश येईल, संततिसुखात बाधा पडेल. महिन्याच्या उत्तरार्धात कसली तरी भीती अस्वस्थ करील, मानसिक ताण सहन करावा लागेल, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल व त्यामुळे नैराश्य येईल. जपा. भाग्यस्थानी असलेला बुध सुद्धा प्रतिकुलच होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत प्रथमपासून शुक्र-शनि-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. त्यापैकी शनि दिनांक १७ पासून या राशीच्या दशम स्थानी जात आहे अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांना लाभदायक होईल. भाग्यस्थानी मकर राशीत असलेला शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व गुरुकृपा, सुसंगती लाभेल, सुख,ऐषाराम लाभेल, काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळेल, थोर मंडळींचा वरदहस्त राहील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर स्थान अनुकुल नसल्याने तो प्रतिकुल होईल व दुःख, त्रास, अडचणी सहन कराव्या लागतीलसे दिसते. तसेच या राशीच्या दशम स्थानी प्रथमपासून असलेला नेपच्यून मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापार असणारांना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत गुरु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे विवाहेच्छूना विवाह योग येण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना वाहनसुख लाभेल, काही मंडळींना अनेक मार्गानी अर्थलाभ होणे संभवते, हाती घेतलेल्या कामात यश लाभेल, इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल, मित्रसुख लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून राहूमुळे दिखाऊ आचरण होणे संभवते. पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांना असा अचानक धनलाभ होणे संभवते. व्ययस्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे काही मंडळींना सांपत्तिक अडचणी त्रस्त करतील, काही मंडळींना नको त्या वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. काही मंडळींना शत्रुत्व, बेअब्रू सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. काही मंडळींना पोटाचे अनारोग्य त्रस्त करीतसे वाटते. पण तो गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना व आध्यात्मिक उपासनेची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत रवि आणि बुध असे दोन ग्रह असून येथील रवि अनारोग्यकारकच होईल; पण तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होण्याची शक्यता दिसते. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत जात आहे. त्या काळात तो अधिक प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, अपयश, संततिसुखात बाधा अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत प्रथमपासून शुक्र व शनि असे दोन ग्रह आहेतच. पण शनि दिनांक १७ रोजी आणि शुक्र दिनांक २२ रोजी या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत जात आहेत अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात शनि अनारोग्यकारक व दुःखदायक होईल,शिवाय तो अपघातकारकही होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गेल्यावर चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, वकिली, व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. शिवाय काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योगही संभवतात. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो या राशीच्या अष्टम स्थानी असताना काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असणारांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने असा धनलाभ होईल. पण हा शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर सुखकारक होईल, गुरुकृपा, सुसंगती लाभेल, क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. तर काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत गुरु असून तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना किंवा व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळेल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वाचे कौतुक करतील. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे ह्या राशीच्या ज्या मंडळींकडे अधिकार पद आहे अशापैकी काहींना

वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो विचार मनातून काढून टाकावा. नपेक्षा " होत्याचे नव्हते होण्यास" वेळ लागणार नाही. जपा. तसेच जुगाराचा नाद असणारांनीही तो नाद सोडावा. शिवाय त्याच्यामुळे संततिविषयक . एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित असेच घडेल. मित्रांशी वाद, भांडणे होतील. शिवाय अकारण शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक खर्चाची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय वाद, भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व दुर्गा देवीचीउपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्राचे व दुर्गा देवी स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र . मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच त्याच्यामुळे कसली तरी चिंता त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत रवि आणि बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे तो नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल नोकरी-व्यवसायात प्रगती करणे सहज शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होणे संभवते. पण तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही शक्य दिसते.या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत असलेला बुध अनुकूल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत प्रथमपासून शुक्र व शनि . असे दोन ग्रह असून येथील शनि दिनांक १७ पासून या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील, पण या राशीच्या विवाहेच्छूंना विवाहयोग संभवत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, दैन्य, अपघातभय संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत असलेला शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होईल. या

राशीच्या विवाहेच्छूनचे  प्रेमविवाह होतील, विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थप्राप्ती होईल. क्वचित कोणास अचानक धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी  कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून  आहेच. तो विषभय जलभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहू नका. या राशीच्या भाग्यस्थानी मीन  राशीत गुरु असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल व त्याच्यामुळे अध्यात्मात उपासनेद्वारे  आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. नोकरी-व्यवसायात प्रगतीसाठी योग्य परिस्थिती निर्माण होईल, सद्‌गुणांची वाढ होईल, काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल  असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे जोकरीत काही मंडळींना अधिकारपद मिळू शकेल. काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते. पण येथील वक्री हर्षलमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि  येईल. पण  त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरी वा व्यवसायच मनापासून करावा. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत वक्री  मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. त्यामुळे तो फारसा अनुकुल होणारच नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे काही मंडळींना  एखाद्या मौल्यवान वस्तूचा  लाभ होणे संभवते. श्रद्‌धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्याचे जन्मनक्षत्र  पुनर्वसू  आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:”  तारक मंत्राचा,ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्याचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:”  तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. पण काही कारणाने मानसिक दु:ख अस्वस्थ करीलसे दिसते. त्यासाठी आध्यात्मिक उपासना केल्यास ,मनाची अस्वस्थता कमी होईल. या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत रवि आणि बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्यामुळे स्वतः:चे अनारोग्य, मुलांपैकी कोणाचे आजारपण, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. नातेसंबंधातील काही प्रिय जनांचे दूरत्व निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मकर

राशीत गेल्यावर नोकरी-व्यवसायास पूरक होईल व हितशत्रू पराभूत होतील. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत असलेल्या बुधामुळे संतती-स्त्रीपासून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत प्रथमपासून शुक्र व शनि आहेतच. पैकी शनि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल; पण त्याच्यामुळे अनारोग्य, गैरसमजुतीने भांडणे होणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर चित्तवृत्ती शांत होईल, पण या राशीच्या विवाहेच्छूचे विवाह जुळून येण्यात अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो केवळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहातच अनुकुल होईल व या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुलच होईल. या राशीच्या कलाकारांमध्ये उच्च कलागुण असूनही ते प्रकट करण्यास संधीच मिळणार नाही. या शुक्रात शुद्ध प्रेमभावना नसून कामुकता असल्याने नैराश्य आल्यास काही मंडळी व्यसनाधीन होण्याची शक्यता दिसते.त्याशिवाय नसते आळही येऊ शकतील. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर प्रेमिकांचे प्रेमविवाह होणे संभवते. तसेच कलाकारांनाही प्रगतीच्या संधी मिळतील. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनातीळ सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून येथील राहू फिरती नोकरी असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. तसेच वक्तृत्व असणारांना सभाधीटपणा प्राप्त होईल व वक्तृत्व कलेचे सार्थक होईल. या भाग्यस्थानी असलेला हर्षल वक्री असल्याने शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाची संधी मिळेल. तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या काही नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. त्यातून वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. पण औषधविक्रेत्यांना तो अनुकुल व

लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीविष्णूची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णु सहस्रनाम स्तोत्रा" चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या-** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत रवि आणि बुध असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, कार्यदिरंगाई होणे, कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे, प्रिय जनांचे दूरत्व होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, संतति सुखात बाधा येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. त्याच्यामुळे गृहसौख्य आणि मित्रसुख लाभेल. पण धननाश होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत प्रथमपासून शुक्र व शनि असे दोन ग्रह आहेतच. पैकी शनि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वृत्ती स्वार्थी, संशयी अशी घडेल. बुद्धी व्यवहारी होईल; पण चिकाटीने काम करण्याचा गुणही देईल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर नोकरी-व्यवसायास पूरक होईल, पण त्याच्यामुळे गैरसमजुती निर्माण झाल्यास भांडणे होणे, शत्रुत्व निर्माण होणे, अनारोग्य होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत असलेला शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या बऱ्याच काळात तो सर्व प्रकारच्या कलावंतांना अनुकुल होईल व त्यांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गेल्यावर आपल्या कलेत अधिक काही करणे शक्य होणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गुरु असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल व काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल, प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, प्रवास योग संभवतो, नवे स्नेहसंबंध

जुळून येतील व अर्थलाभ होणेही शक्य दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून येथील राहूमुळे अनारोग्य होणे संभवते. शिवाय नोकरीत ज्यांच्या हाती अधिकार पद आहे अशापैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अनावर होईल. पण प्रयत्नपूर्वक या मोहाला बळी पडू नका. नुकसानच होईल. जपा. या स्थानी असलेला वक्री हर्षल धोकादायक असून त्याच्यामुळे अपघात भय असल्याने सतत सर्व ठिकाणी सावधानपूर्वक आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. पण तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल होण्याचीच शक्यता दिसते. या काळात शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास व मानहानी होण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने
“शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो अनुकुल व सुखदायक होईल. पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे वाहन सतत सावधानतेने व नियंत्रित वेगानेच चालवा. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत रवि आणि बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व सुखसमाधान लाभेल, धनलाभ होईल व नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामगिरीवर प्रसन्न होतील. क्वचित कोणाचा सन्मान होईल; तर कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल; व त्याच्यामुळे अनारोग्य, कौटुंबिक त्रास, दु”ख, निराशा, कार्यदिरंगाई अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत असलेला बुध प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे हितशत्रूपासून धोका होईल. जपा. त्याशिवाय नव्याने शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी प्रथमपासून शुक्र व शनि असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील शनि दिनांक १७ पासून या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य हानी होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात

पंचम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना चिकाटी वृत्ती देईल, अनुकुल व प्रगतिकारक होईल . पण स्वभाव स्वार्थी, संशयी होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत असलेला शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. ही दोन्ही स्थाने त्याला अनुकुल असल्याने सुख, समाधान लाभेल, शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल, तसेच सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत सहज प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे उपासनेद्वारे आध्यात्मात प्रगती करणे शक्य होईल. पण मनस्थिती अति भावनाशील होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गुरु असून तो सुखदायक होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल. काही मंडळींना नोकरचाकराचे सुख लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून राहूमुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील, व विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. येथील वक्री हर्षलमुळेही पतिपत्नीपैकी कोणाच्या विक्षिप्त आचरणामुळे, दोघांतील मतभेदामुळे वाद, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार निर्माण होतील. तसेच हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. खोल पाण्यात पोहू नका. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी धनु राशीत रवि आणि बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. शिवाय आर्थिक समस्याही अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व सर्व काही मनासारखे घडेल. आरोग्य सुधारेल. धनप्राप्ती होईल. नोकरीत अधिकार पद मिळू शकेल. या राशीच्या

धनस्थानी प्रथमपासून बुध आहेच. तो दुःखदायक होईल' पण धनदायक होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी प्रथमपासून शुक्र व शनि हे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील शनि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहे. तसेच येथील शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात शनीमुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीतसे दिसते. पण काही मंडळींना नवी नोकरी तर काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गेल्यावर गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. पण शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होणार असल्यामुळे . काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. आहेच. राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे घरगुती प्रकरणांबाबतीत गैरसमज निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे अपेक्षित असे सर्व सुख मिळेल. अर्थलाभ होईल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे प्रेमसंबंध जुळून येतील. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू अनारोग्यकारक होईल. पण ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे अधिक अर्थलाभ होईल. या स्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे मनस्थिती चंचल, अस्वस्थ होईल. काही मंडळींना मुदतीचा ताप येईल. या राशीच्या विचारवंतांनी सतत सखोल विचार करत बसू नये. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. अशा परिस्थितीत तो वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी वाद, भांडण, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रविआणि बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, कसली तरी चिंता अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. त्यामुळे थकावट जाणवेल. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत असलेला बुध प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत प्रथामपासून शुक्र व शनि असे दोन ग्रह आहेतच. येथील शनि महिन्याच्या उत्तरार्धात व शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शनि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. तसेच कौटुंबिक जीवनात प्रिय जनांपैकी काहींशी दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल व नैराश्य येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गेल्यावर त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी तर काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. येथील शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व धनलाभदायक होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभण्याची शक्यता असल्याने परिस्थिती फारशी प्रतिकुल होणे संभवत नाही. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे मनस्थिती भावनाशील होईल, पण त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशवारीची संधी मिळेल. तसेच अध्यात्म आणि गूढ संशोधन यांची आवड असणारांना तो यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळेही कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. तसेच स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहारासही हा गुरु अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतही अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. पण येथील हर्षल वक्री असला तरी उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. पण तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुखापत होणे, चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल व सुखदायकच होईल.

श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गरुचरित्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ ओम निॠतये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत रवि-बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. त्याशिवाय अनारोग्य, मनस्ताप व कसली तरी चिंता अस्वस्थ करीतसे दिसते.या राशीच्या व्ययस्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अपयश, मानहानी होणे संभवते. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून शनि व शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील शनि दिनांक १७ पासून तर शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शनि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे, अनारोग्य होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, नियोजित कार्यात अडचणी , अडथळे निर्माण होणे संभवते. पण येथील शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व सुखकारक होणार असल्यामुळे फारसा मनस्ताप करावा लागणार नाही, असे वाटते. तसेच या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत असलेल्ल्या नेपच्यूनमुळे आर्थिक संकटे निर्माण होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत गुरु असून तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. त्याच्यामुळे या राशीच्या लेखकांचे लिखाण ग्रंथरूपात प्रकाशित होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील. त्यांच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. वक्री हर्षलमुळे तर काही झाले तरी सुख समाधान लाभणारच नाही. कोणाशी पटणार नाही, वास्तुसुखही मिळणार नाही, असे दिसते. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. त्याच्यामुळे संततीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. काही मंडळींना स्थावरसंबंधी मनस्ताप सहन करावा लागणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या

राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून कोणता तरी व्यापार-व्यवसाय करावा अशी ऊर्मि अस्वस्थ करील. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यय स्थानी मकर राशीत जात आहे . अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत असलेल्या बुधामुळे अनेक प्रकारचे लाभ होतील. धनलाभ, मित्रलाभ होणे संभवते. तसेच सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून शुक्र व शनि असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील शनि महिन्याच्या उत्तरार्धात आणि शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शनि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल त्याच्यामुळे अनारोग्य, आर्थिक नुकसान व संकट परंपराच निर्माण होईल. जपा. पण येथील शुक्रामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. त्यामुळे प्रतिकुल काळ व्यतीत करणे सुसह्य होईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. व आर्थिक लाभ होतील. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. या स्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची साधी मिळेल. तसेच उच्च बौद्धिक शक्ती, स्मरणशक्ती आकलनशक्ती प्राप्त होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. पण संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच कुटुंबात असमाधानकारक घटना घडणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे

ढोंगी आचरण केले जाईल. व संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचराणाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु असून शुभकारक असल्यामुळे आरोग्य उत्तम राहील, व बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे कुटुंबात कलह निर्माण होतील व आर्थिक चिंता अस्वस्थ करील. तसेच येथील वक्री हर्षलमुळे तर मनस्थिती अधिकच चंचल, अस्थिर होईल व अविचारी आचरण घडण्याची शक्यता दिसते. तसेच आपल्या अविचारी फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही समजणार नाही. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १२ पासून मार्गी होत आहे. हा मंगळ शुभकारक असून त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल. प्रवास योग येईल,पण एखादी इजा होण्याची दाट शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. तसेच्या या राशीच्या काहींना त्वचारोगाचा तर काहींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. तसेच त्याच्यापासून अपघातभय असणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुलच होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक, मानसिक सुखसमाधान लाभेल, तसेच मित्रसुखही लाभेल. नोकरी-व्यवसायात प्रगती होईल, काही मंडळींना कीर्ति -प्रसिद्धी मिळणेही संभवते. अर्थलाभ होईल व आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत प्रथमपासून शनि व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील शनि महिन्याच्या उत्तरार्धात व शुक्र दिनांक २२ पासून या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, सुखकर व लाभदायक होईल. पण येथील शनि महिन्याच्या पूर्वार्धात सर्वसाधारणपणे अनुकुल व लाभदायक होईल.

आणि त्याच्यामुळे संततीपैकी कोणास कसला तरी त्रास होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो पूर्णपणे प्रतिकूल होईल व त्राही भगवान करून सोडेल. जपा. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण तो गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने ज्याचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा भाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====०००००O००००००=====